Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XII ISSUE- XI NOVEMBER 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# 21 व्या शतकातील बदलत्या विश्वरचनेत भारतासाठी स्वदेशी संरक्षण सिद्धतेची आवश्यकता

**डॉ. शार्दुल सेलूकर**
प्राध्यापक व विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित

**प्रस्तावना :**

1974 मध्ये स्वातंत्र्य मिळवलेल्या भारताने आपल्या लोकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी एक स्वतंत्र परराष्ट्र धोरण विकसित केले आहे. तत्कालीन जागतिक परिस्थिती पाहता, भारतीय परराष्ट्र धोरणाच्या प्राथमिक उद्दिष्टांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा जपणे, आर्थिक विकास, राष्ट्रीय हितांना चालना देणे, आणि जागतिक मुद्द्यांवर भारताचा प्रभाव दर्शवणे यांचा समावेश होता. आपले राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला आपापले परराष्ट्र धोरण तयार करावे लागते व ते कार्यान्वित करावे लागते. मागील जवळपास आठ दशकात आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाचे स्थूल मानाने दोन विभाग करतो. 1947 ते 2000 या काळात अलिप्ततावादी किंवा असंलग्नतावादी परराष्ट्र धोरणाचा स्वीकार भारताने केलेला होता तर इ. स. 2000 पासून पुढे भारताने बहुसंलग्नतेचे धोरण स्वीकारले आहे असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. यातही अधिक सूक्ष्मपणे अभ्यास केल्यास 1962 पर्यंतचे आदर्शवादी अलिप्ततावादी धोरण 1962 ते 1971 या काळातील वास्तववादी परराष्ट्र धोरण, 1971 ते 1991 या काळातील रशियाकडे झुकलेला अलिप्ततावाद, 1991 ते 2000 या काळातील आपली सामरिक स्वायत्तता जपण्यासाठी व आर्थिक हितसंबंधांच्या रक्षणासाठी चे परराष्ट्र धोरण हे अलीप्ततावादाचे तीन भाग करता येतील. पुढे ई.स. 2000 ते 2014 हा काळ बहुसंलग्नतेची पायाभरणी करण्याचा काळ होता तर 2014 पासून पुढे प्रत्यक्ष बहुसंलग्नतेचे धोरण अमलात आणण्याचा काळ होता असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

परराष्ट्र धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित राष्ट्राची राष्ट्रीय शक्ती किती आहे ही बाब अतिशय निर्णायक ठरते. राष्ट्रीय शक्ती कमी असेल तर अनेक वेळेला राष्ट्रांना आपल्या धोरणांच्या विरोधी देखील भूमिका घ्याव्या लागतात. भौगोलिक स्थान, लोकसंख्या, नैसर्गिक साधन संपत्ती, आर्थिक संपन्नता, ऊर्जा संपन्नता, औद्योगीकरण, लष्करी सामर्थ्य, राष्ट्रीय चारित्र्य, नेतृत्व, गुणवत्तापूर्ण राजनय हे काही राष्ट्रीय सामर्थ्याचे प्रमुख घटक ठरतात. (रुमकी बासू, 2017, pg.8) पामर & पार्किन्स च्या मते '.....लष्करी सामर्थ्याला स्वत: एक मूलभूत घटक मानण्याऐवजी, राष्ट्राच्या सामर्थ्याच्या मूलभूत पैलूंचा तो एक 'अंतिम परिणाम' म्हणून पाहिला जातो..'(Palmer & Parkins, 2007, pg.35) पैकी प्रस्तुत संशोधन लेखात पहिल्या पाच दशकात भारताच्या संरक्षण सिद्धतेची वस्तुस्थिती काय होती? भारताने मागील दोन दशकात आपल्या परराष्ट्र धोरणाच्या सक्षम पणे कार्यान्वयनासाठी आवश्यक संरक्षण सिद्धतेसाठी कोणत्या योजना राबवल्या आहेत? आणि त्याचा काय परिणाम दिसत आहे? याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**भारताची सैनिकी क्षमता : एक आढावा**

भारत हा खेड्यांचा देश आहे व मध्ययुगीन काळापर्यंत भारतातील खेडी ही स्वयंपूर्ण होती, स्वावलंबी होती. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने आणि नंतर ब्रिटिश शासनाने भारताची अपरिमित अशी लुट केली. सर्वप्रथम ज्या बंगाल प्रांतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने आपले पाळेमुळे खोलवर रुजवली त्या बंगाल प्रांतातील कंपनीच्या विशेषत: वॉरेन हेस्टिंग्ज यांच्या कारभाराच्या बाबतीत 1783 साली ब्रिटिश पार्लमेंट मध्ये जी चर्चा झाली त्या चर्चेत थोर विचारवंत एडमंड बर्क यांनी भारतातून होणाऱ्या सततच्या आर्थिक शोषणाचे विनाशकारी परिणाम सांगितले होते. यासाठी त्यांनी गव्हर्नर वेरेलस्ट आणि हाऊस ऑफ कॉमर्स च्या सिलेक्ट कमिटीचे अहवाल याचा संदर्भ घेतला होता.

Poverty and Un-British Rule in India (1901) या ग्रंथात दादाभाई नौरोजी यांनी आणि रोमेश चंद्र दत्ता यांनी

आपल्या The Economic History of India Under Early British Rule (1902) व The Economic History of India In the Victorian Age (1904) या दोन ग्रंथात ब्रिटीशांनी भारताची लुट किती व कश्या प्रकारे केली याबाबत सविस्तर लिखाण केले. प्रा. अँगुस मॅडिसन यांनी आपल्या ग्रंथात भारताची अर्थव्यवस्था ब्रिटिश येण्यापूर्वी जगाच्या एकूण 25% पेक्षा अधिक होती व ब्रिटिशांच्या आगमनानंतर ती सहा टक्क्यावर आली हे पद्धतशीरपणे मांडले आहे. (Angus Maddison. 2007. p. 381) स्वातंत्र्य पूर्वकाळात ब्रिटिशांनी भारताची जी लूट केली त्याचा परिणाम असा झाला की येथील 30 कोटी पेक्षा अधिक जनतेच्या मूलभूत गरजांची पूर्तता करणे अशक्यप्राय होते. स्वातंत्र्यानंतर राष्ट्रनिर्मात्यांनी भारताचे परावलंबित्व दूर होण्यासाठी रशिया पासून प्रेरणा घेऊन समग्र अशा पंचवार्षिक योजना राबवल्या, राष्ट्राची वर्तमान व भविष्यकाळातील गरज लक्षात घेऊन वेगळ्या वेगळ्या स्वतंत्र योजना आखल्या. याचाच परिणाम म्हणून आपणास हरितक्रांती, नीलक्रांती, धवलक्रांती वास्तविकेत उतरताना पाहायला मिळाल्या. याबरोबरच शिक्षण, दळणवळण, आरोग्य, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर, कपडा व्यवसाय इत्यादी बाबतीत भारताने दैदीप्यमान अशी प्रगती करून अनेक बाबतीत स्वावलंबी मिळवलेले दिसते.

परंतु स्वातंत्र्यानंतर पहिल्या दोन दशकातच भारतावर 3 युद्ध लदली गेली. भारत एकाच वेळी अनेक आघाड्यांवर काम करायचे होते. अर्थातच संरक्षणावर खर्च ही तेव्हाच्या नेतृत्वाच्या दृष्टीने तुलनेने कमी महत्त्वाची बाब असल्याकारणाने भारताने संरक्षण क्षेत्रामध्ये फारशी प्रगती केलेली नव्हती. 1965 नंतर भारतीय नेतृत्वाचा संरक्षण क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला दिसतो. 1971 चे भारत पाकिस्तान युद्ध आणि 1998 चे भारत पाकिस्तान कारगिल युद्ध हे भारतासाठी विजय मिळवून देणारे युद्ध असले तरी नजीकच्या भविष्यातच आपल्या संरक्षण सिद्धतेमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर परिवर्तन करणे गरजेचे आहे हे भारतीय नेतृत्वाला कळून चुकले होते. कारगिल युद्धाच्या वेळी भारताचे लष्कर प्रमुख असलेले जनरल व्ही पी मलिक यांनी आपल्या पुस्तकात कारगिल युद्धाचे प्रसंग व युद्धानंतरच्या घडामोडी याबाबत अतिशय सविस्तर लिखाण केलेले आहे. 'भारतातील लष्करी साहित्याच्या अभावाबरोबरच राष्ट्रीय सुरक्षा उद्दिष्टांमध्ये स्पष्टता नसणे, एकात्मिक योजनेचा अभाव, नियोजन आणि अंदाजपत्रकातील कमकुवत दुवे, संरक्षण क्षेत्रात लागणाऱ्या गरजा आणि संशोधन संस्था होणारे संशोधन यात एकवाक्यता नसणे, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ची नियुक्ती, अशा अनेक बाबींकडे लक्ष वेधले होते.' ( व्ही पी मलिक, 2016, pg. 124-125)

**कारगील युदधानंतरचे भारताचे सैनिकी दृष्टीने स्वावलंबनाचे प्रयत्न :**

भारताला 15100 कि.मी. ची भूसीमा आणि 7500 कि.मी. ची सागरी सीमा आहे. उत्तरेला विशाल हिमालय तर दक्षिणेला अथांग असा हिंद महासागर, पूर्वेला बंगालचा उपसागर तर पश्चिमेला अरबी समुद्र आहे. भारताच्या भू सीमा चीन भूतान नेपाळ पाकिस्तान बांगलादेश आणि म्यानमार यांच्याशी तर सागरी सीमा बांगलादेश म्यानमार पाकिस्तान श्रीलंका थायलंड आणि इंडोनेशिया यांच्याशी जोडल्या गेलेले आहेत. भारताचे भौगोलिक क्षेत्रफळ जगाच्या एकूण क्षेत्रापैकी सुमारे 2.4 टक्के आहे व भारत क्षेत्रफळानुसार जगातील सातवा सर्वात मोठा देश आहे. या सर्व बाबीचा विचार करता अंतर्गत सुरक्षितता आणि बाह्य सुरक्षितता यासाठी भारताला खूप मोठ्या प्रमाणावर सैनिकी शक्तीची आवश्यकता आहे. परंतु या आधीच स्पष्ट केल्याप्रमाणे पहिले काही दशके भारताला अन्न, वस्त्र, व निवारा या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी लागणार होती. यातच पाकिस्तान व चीन सोबत झालेल्या प्रारंभिक युद्धामुळे भारताला मोठ्या प्रमाणावर सैन्यसामग्री इतर देशांकडून विकत घ्यावी लागली. **अल्पावधीतच भारत जगातील सर्वात महत्त्वाचा शस्त्रास्त्र आयात करणारा देश बनला.** जेव्हा अमेरिकेने पाकिस्तानला सहकार्य करण्याचे धोरण अवलंबले तेव्हा पासून भारत रशियाकडून सर्वाधिक जास्त शस्त्र विकत घेऊ लागला. भारताला लागणाऱ्या एकूण सैन्यसामग्रीच्या 70% सामग्री भारताला आयात करावी लागत होती यावरून भारत शस्त्रास्त्रांसाठी किती मोठ्या प्रमाणावर रशियावर अवलंबून होता हे स्पष्ट होते. 2000 सालापर्यंत हे चित्र फारसे बदललेले नव्हते.

स्टॉकहोम आंतरराष्ट्रीय शांतता संशोधन संस्थेच्या (SIPRI) मार्च 2025 च्या लेखात भारताच्या शस्त्र आयातीबाबत सविस्तर लिखाण केलेले आहे. त्यांच्या मते, 'भारत आणि चीन व पाकिस्तान यांच्यातील तणावामुळेच भारताची शस्त्र आयात मोठ्या प्रमाणात प्रभावित होते. 2020-2024 या काळात भारत जगातील दुसरा सर्वात मोठा

शस्त्र आयातदार देश होता, ज्याचा जागतिक आयातीत 8.3 टक्के वाटा होता.' भारताच्या आयातीचा सर्वात मोठा वाटा म्हणजे 36% रशियाकडून होता; जो 2010 ते 2014 या काळात 72 % होता. भारत आपल्या शस्त्र पुरवठ्याचे संबंध पाश्चात्य पुरवठादारांकडे, विशेषतः फ्रान्स, इस्रायल आणि अमेरिकेकडे वळवत आहे.' (George Mathew and others, 2024) याच रिपोर्टमधून आपणास हे ही समजते की 2015-2019 च्या तुलनेत 2020-2024 या कालावधीत भारताच्या शस्त्र आयातीत 9.3% इतकी घट झाली. ही घट भारताच्या स्वतःची शस्त्रे डिझाइन करण्याची आणि उत्पादन करण्याची क्षमता वाढल्यामुळे झाली, ज्यामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी झाले. शासनाच्या 'मेक इन इंडिया' आणि 'स्टार्ट अप इंडिया' या धोरणांमुळे देशातच सैनिकी सामग्रीचे उत्पादन कमालीचे वाढलेले दिसते. प्रेस माहिती ब्युरो (संरक्षण विभाग) भारत सरकार यांनी 9 ऑगस्ट 2025 रोजी प्रसारित केलेल्या प्रसिद्ध पत्रकात 2024-25 मध्ये भारताचे संरक्षण उत्पादन 1.51 लाख कोटी रुपये इतके झाल्याचे म्हटले आहे, जे 2019-20 मध्ये 79 हजार कोटी रुपये इतके होते. म्हणजे मागच्या पाच वर्षात संरक्षण उत्पादनामध्ये 90% पेक्षा अधिक वाढ झालेली दिसते. (https://mod.gov.in/sites/default/files/Defence-production-soars_0.pdf)

भारताच्या संरक्षण संशोधन संस्थांमध्ये मागील दहा वर्षांमध्ये फार मोठ्या प्रमाणामध्ये सार्वजनिक आणि खाजगी गुंतवणूक वाढवली गेली. याचा परिणाम असा झाला की सर्वच प्रकारच्या सैनिकी सामग्रीमध्ये भारताला भारतात उत्पादन करणे शक्य होऊ लागले. यात सैन्यासाठी लागणारे पोशाख यापासून ते ब्राह्मोस मिसाईल पर्यंत सर्व बाबी भारतात बनवल्या जाऊ लागल्या व जे उत्पादन आधी बनत होते त्याचे प्रमाण कित्येक पटीने वाढवले गेले. आरमारासाठी लागणारे मोठमोठे युद्ध पोत, सैन्यासाठी लागणारे रणगाडे आणि तोफा, वायुसेनेसाठी लागणारे लढाऊ विमान आणि हेलिकॉप्टर हे सर्व आता भारतात तयार होत आहे. आत्मनिर्भर भारत या योजनेअंतर्गत भारताने स्वतःची अशी एक संरक्षण प्रणाली विकसित केली आहे जिथे यश ऑपरेशन सिंदूर मध्ये सर्वांनी पाहिले आहे.
(https://static.pib.gov.in/WriteReadData/specificdocs/documents/2025/may/doc2025514554901.pdf)

'मेक इन इंडिया' आणि 'स्टार्ट अप इंडिया' याबरोबरच भारताने 'मेक फॉर द वर्ल्ड' या योजनेचाही अवलंब मागील दहा वर्षात केलेला दिसतो. 2014-15 ते 2024-25 या दहा वर्षांच्या कालावधीत भारताच्या संरक्षण सामग्री निर्यातीत कित्येक पटीने वाढ झालेली दिसते जी आपणास पुढील आकृतीमध्ये स्पष्ट होते.




Figure reference:
https://static.pib.gov.in/WriteReadData/specificdocs/documents/2025/apr/doc202543531401.pdf

**सारांश :**

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात स्वावलंबनासाठी 'रोटी कपडा और मकान' या गरजांची पूर्तता अनिवार्य समजली जात होती. परंतु एकविसाव्या शतकात स्वावलंबनाचे आयाम बदललेले दिसतात. सक्षम अर्थव्यवस्था, तंत्रज्ञानात्मक प्रगती, ऊर्जा संपन्नता, कुशल मानव संसाधन क्षमता आणि संरक्षण सिद्धता हे स्वावलंबनाचे प्रमुख आयाम बनलेले दिसतात. भारताला या नवीन गरजांच्या पूर्ततांसाठी इतर देशांवर अवलंबून राहावे लागलेले आहे. भारतासारख्या खंडप्राय देशासाठी हे नवीन बदललेले आयाम म्हणजे हिमालयासारखे आव्हानच आहे. 7 दशकांच्या अथक प्रयत्नांचा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो तो म्हणजे भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थसत्ता आहे, चौथी मोठी सैन्य व सामरिक शक्ती, चौथी उत्पादक शक्ती, जगातली सहावी मोठी अन्वस्त्रधारी सत्ता, पाचवी सर्वात प्रभावी अंतरिक्ष संशोधन संस्था असलेले राष्ट्र असा भारताचा प्रवास दिसतो. 1991 मध्ये स्वीकारलेल्या मुक्त आर्थिक धोरणाने

भारताच्या आर्थिक महासत्ता होण्याच्या प्रवासाला सुरुवात झाली असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. भारताच्या 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया' आणि 'मेक फॉर द वर्ल्ड' या योजना धोरणात्मक स्वायत्ततेचा परिणाम आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. मागील वीस वर्षात ज्या योजना शासनाने तयार केल्या व ज्या दिशेने भारताची प्रगती होत आहे त्यावरून आपण असे भाकीत करू शकतो की येणाऱ्या काळात भारत या आव्हानांना तोंड देत संरक्षनाच्या बाबतीत निश्चितच एक स्वावलंबी राष्ट्र बनेल.

संदर्भ

1. रुमकी बासू (संपादित), 2017, आंतरराष्ट्रीय राजकारण - संकल्पना, सिद्धांत आणि समस्या, SAGE Publications, New Delhi.
2. Palmer & Perkins, 2007, International Relations, A.I.T.B.S. Publications, Delhi.
3. Angus Maddison (2007) ‘The Contours of World Economy 1-2030 AD, Oxford University Press, Oxford.
4. व्ही पी मलिक, 2016, भारताचे लष्करी संघर्ष आणि राजनय - निर्णय प्रक्रियेचे अंतरंग, सकाळ प्रकाशन, पुणे.
5. George Mathew and others, 2024, Trends In International Arms Transfers, 2024, (SIPRI Fact Sheet) downloaded on 10.12.2025. from https://www.sipri.org/sites/default/files/2025-03/fs_2503_at_2024_0.pdf